पंतप्रधान मोदी म्हणाले की, सर, मी तुम्हाला भेटू शकतो का?, डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा >> पान 2

रवींद्र चव्हाणांची चूक लातूरमध्ये जाऊन सुधारली, फडणवीस म्हणाले, आमची लढाई काँग्रेसशी, पण विलासरावांबद्दल आम्हाला नितांत आदर >> पान 3

बिबी पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी >> पान 4

**सुविचार**

चुकांची भीती बाळगू नका. कारण कोणीच संपूर्ण नाही. परंतु त्याच चुका पुन्हा पुन्हा करु नका. – आचार्य अत्रे


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 153 ■ गुरूवार, दि. 08 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





मुक्ता बर्वेची नव्या वर्षाची खास भेट, माया चित्रपट यादिवशी येतोय भेटीला

आतील पान

# महाराष्ट्रात गुंडाराज, कायदा-सुव्यवस्था बिघडली

## भाजपासोबत युती नाही, हर्षवर्धन सपकाळ यांची राज्य सरकारवर टीका

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी (७ जानेवारी) अमरावती इथं पत्रकारांशी संवाद साधताना राज्यातील कायदा–सुव्यवस्थेवर गंभीर चिंता व्यक्त करत राज्य सरकारवर आणि मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. महाराष्ट्रात सध्या गुंडाराज सुरू असून, ते चालवणारे सत्ताधारीच गुंड झालेत, असा घणाघाती आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.**

राज्यातील गुन्हेगारी घटनांमध्ये सातत्यानं वाढ होत असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. कायदा–सुव्यवस्था सांभाळण्यात सरकार पूर्णत: अपयशी ठरलं आहे. राज्यात सध्या अराजकतेचे वातावरण असून पोलीस प्रशासनावर राजकीय दबाव टाकला जातोय, असंही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.




घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याचा तीव्र निषेध करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेला सरकारच्या अपयशाचं प्रतीक असल्याचं म्हटलं आहे. ''या हल्ल्यात हिदायत पटेल यांचा मृत्यू झाला असून, ही घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी आहे. अशा प्रकारच्या गंभीर घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या 'कृपा–आशीर्वादामुळंच' संपूर्ण महाराष्ट्रात अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत,'' असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. तसंच त्यांनी म्हटलं की, ''सत्ताधाऱ्यांचे संरक्षण असल्यामुळं गुन्हेगारांवर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळं गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळत आहे.''

अंबरनाथ नगरपरिषदेत काँग्रेस–भाजपा >> पान २

## मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेंच हवेत; आणखी एक नेता ठाकरे बंधूंच्या पाठीशी

**मुंबई/प्रतिनिधी** :मुंबई महापालिका निवडणूक मराठी माणूस वि. हिंदी भाषिक या लाईनवर येत असताना आता आणखी एका नेत्याने ठाकरे बंधूंना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत, आमची त्यांना सहानुभूती आहे असं शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी म्हणाले. महाराष्ट्राच्या हक्काचे किती प्रकल्प गुजरातला पाठवले



याची माहिती घ्यावी, म्हणजे मुख्यमंर्त्याचे मराठीवरील प्रेम दिसून येईल असा टोलाही राजू शेट्टी यांनी लगावला. शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी धाराशिवमध्ये झालेल्या आंदोलनानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

महापालिकेच्या निवडणुकीत राज्यात इतर ठिकाणी काँग्रेसला पाठिंबा देणाऱ्या राजू शेट्टी यांनी मुंबईत मात्र ठाकरे बंधूंना पाठिंबा जाहीर केला आहे. आमचे वैचारिक मतभेद असले तरीही मुंबईत मराठी माणसाच्या भल्यासाठी ठाकरे बंधूच विजयी व्हावेत असं राजू शेट्टी म्हणाले.

## इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी

**मुंबई /प्रतिनिधी :** राज्यात प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता सातवी) २६ एप्रिल २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in आणि https://puppssmsce.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली.

शासनमान्य शाळांमधून २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता चौथीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व सातवीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरण्यासाठी २ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला असून विलंब, अतिविलंब आणि अति विशेष विलंब शुल्कासह २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, असे परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## दिल्लीतील फैज-ए-इलाही मशिदीजवळ मध्यरात्री बुलडोझर कारवाई; पोलिसांवर दगडफेक, ५ जणांना अटक

**दिल्ली** : दिल्ली महानगरपालिकेनं आज (७ जानेवारी) सकाळी रामलीला मैदानाजवळील तुर्कमान गेट परिसरात एक मोठी अतिक्रमणविरोधी मोहीम सुरू केली. दिल्ली उच्च न्यायालयाच्या कडक सूचनांनुसार, या कारवाईत १७ बुलडोझर आणि मोठ्या प्रमाणात पोलीस दलाचा वापर करण्यात आला.अशा प्रकारच्या कारवाया सहसा सकाळी ८ वाजल्यानंतर सुरू होतात, परंतु सुरक्षेच्या कारणास्तव आणि संभाव्य विरोधामुळे प्रशासनानं पहाटे १:३० वाजताच कारवाई सुरू केली. या कारवाईचा प्राथमिक उद्देश फैज–ए–इलाही मशिदीजवळ आणि रामलीला मैदानाच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे बांधलेलं एक सामुदायिक सभागृह (बारात घर), एक दवाखाना आणि काही व्यावसायिक इमारती पाडणं हा होता.बुलडोझरनं बेकायदेशीर बांधकाम पाडण्यास सुरुवात करताच, स्थानिक रहिवाशांनी तीव्र विरोध केला. यावेळी काही जणांनी पोलीस आणि महापालिका कर्मचाऱ्यांवर दगडफेक करण्यास सुरुवात केल्यानं परिस्थिती आणखी बिकट झाली.

## छत्रपती संभाजीनगर : इम्तियाज जलील खोटारडा व ब्लॅकमेलर संजय शिरसाट

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप करत शिवसेना (शिंदे गट) नेते तथा आमदार संजय शिरसाट यांनी तीव्र शब्दांत टीका केली आहे. इम्तियाज जलील हे खोटारडे असून ब्लॅकमेल करण्यात माहीर असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला आहे.

शिरसाट म्हणाले की, ज्या कार्यकर्त्यांनी अलीकडे हल्ला केला, ते कार्यकर्ते पूर्वी इम्तियाज जलीलसाठी जीव ओवाळून टाकणारे होते. मात्र, जलील यांनी पैशांच्या बदल्यात तिकीटे विकली आणि त्या निष्ठावान कार्यकर्त्यांना बाजूला सारले. त्यामुळेच आज संतप्त कार्यकर्ते आपला रोष व्यक्त करत असल्याचे त्यांनी सांगितले.

''जैसी करणी, वैसी भरणी'' हे



आज इम्तियाज जलीलला अनुभवायला मिळत असल्याचे म्हणत शिरसाट यांनी टोला लगावला. ''शेर आया, शेर आया'' म्हणणाऱ्या इम्तियाज जलीलला आज पळावे लागत आहे. 'जनता मेरे साथ है' असे सांगणारा नेता आज शेपूट घालून पळताना संपूर्ण महाराष्ट्र पाहत आहे, अशी टीकाही त्यांनी केली. दरम्यान, हल्लयाच्या घटनेवर भाष्य करताना संजय शिरसाट यांनी पोलिसांनाही प्रश्न उपस्थित केले.

दगडफेक किंवा हल्ला करणाऱ्यांना पोलिसांनी पकडून मारहाण का केली, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. पोलीस संरक्षणात गुंड पाठवण्याची गरज नसल्याचेही ते म्हणाले.

इम्तियाज जलील यांची ''ओवेसी माझ्यासोबत आहे, मला कोणी वाकडे करू शकत नाही'' अशी जी मस्ती होती, त्याचे उत्तर आज त्यांना मिळाल्याचा दावा शिरसाट यांनी केला. आज संध्याकाळी ओवेसी भडक भाषण करून मुस्लिम समाज माझ्यासोबत आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करतील, मात्र त्यांना कार्यकर्त्यांनी आधीच उत्तर दिले असल्याचे शिरसाट म्हणाले.

या आरोपांमुळे छत्रपती संभाजीनगरच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले असून, पुढील काळात याचे पडसाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## दैनिक आपला विदर्भाचा दणका! प्रशासन खडबडून जागे

# आपला विदर्भाची बातमी ठरली निर्णायक मोकाट कुत्र्यांवर कारवाईचे आदेश

➤ डोणगावातील मोकाट कुत्र्यांच्या दहशतीवर प्रशासन खडबडून जागे

➤ बातमी लागली आणि आदेश निघाले ग्रामपंचायतीला तातडीच्या कारवाईचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव (ता. मेहकर):** डोणगावच्या मेन रोडवरील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या दहशतीबाबत दैनिक आपला विदर्भ मध्ये दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या सडेतोड बातमीचा अखेर मोठा परिणाम झाला आहे. दैनिक आपला विदर्भाच्या दणक्याने प्रशासन खरवडून जागे झाले असून पंचायत समिती मेहकर यांनी ग्रामपंचायत डोणगाव यांना तात्काळ बंदोबस्ताचे लेखी आदेश दिले आहेत.

शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक, पादचारी तसेच चक्क पोलीस स्टेशनपर्यंत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव पोहोचल्याची धक्कादायक बाब दैनिक आपला विदर्भने उघडकीस आणली होती. या बातमीमुळे गावात संतापाची लाट उसळली आणि त्यानंतर शेतकरी क्रांतिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांनी असंख्य कार्यकर्ते घेऊन आज पंचायत समिती मेहकर येथे ठिय्या आंदोलन केले. यावेळी शिवसेनेचे अमोल धोटे यांनी सुद्धा मुद्दा रेटून धरला


दैनिक आपला विदर्भ
मुख्य संपादक : देविदास खनपटे 9767233034

डोणगावमध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत: पोलीस स्टेशनपर्यंत टोळक्याचा थैमान

प्रशासनाची उदासीनता, शाळकरी मुलं, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी भयभीत

ग्रामपंचायत व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तातडीच्या उपाययोजनेची गरज, मेन रोडवर दहशत: नागरिकांचा संताप

दैनिक आपला विदर्भ

डोणगाव/कार्यालय प्रतिनिधी : डोणगावच्या मेन रोडवर मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या जीवनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळकरी मुले, कॉलेज विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सामान्य पादचारी टोळक्यांमुळे भयभीत आहेत. पालक मुलांना शाळेत पाठवण्यास घाबरत आहेत, तर काहींना रोज मुलांची ने–आण करावी लागत आहे. सकाळ–सायंकाळी टोळक्याने गँगसारखी हालचाल करत रस्त्यावर धाव घेणे, भुंकणे आणि पाठलाग करणे सामान्य झाले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे: ''एक गंभीर अपघात होण्याआधी प्रशासनाने कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे.'' सार्वजनिक ठिकाणी मोकाट कुत्र्यांची नोंद ठेवणे; कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी मोहिमा राबवणे; नागरिकांच्या तक्रारी वेळेत प्रशासनास कळवणे

विशेष: पोलीस स्टेशनलाही कुत्र्यांचा थैमान!

डोणगाव पोलीस स्टेशनच्या गेटवर चक्क मोकाट कुत्र्यांचा जमाव पाहायला मिळाला. पोलीस स्टेशनसारख्या सुरक्षित समजल्या जाणाऱ्या ठिकाणीही कुत्र्यांचे टोळके बसले होते. नागरिक म्हणाले: ''जेथे नागरिक संरक्षणासाठी जातात, त्या पोलीस स्टेशनच्या प्रवेशद्वारावरच कुत्र्यांची दहशत असेल, तर सामान्य नागरिकांना सुरक्षिततेची अपेक्षा कुणाकडून करावी?'' या घटनेने प्रशासनाच्या उदासीनतेवर थेट प्रश्नचिन्ह उभे केले आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की मोकाट कुत्र्यांवर तातडीने उपाययोजना करणे प्रशासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे. ''जर लवकर कारवाई झाली नाही, तर नागरिक आंदोलनही होऊ शकते,'' असे इशारे नागरिकांनी दिले आहेत.

नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे; मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी योजना राबवणे; अपघात किंवा प्रकोप टाळण्यासाठी तातडीची ग्रामपंचायत प्रशासनाने उपाययोजना व कारवाई करणे आवश्यक

पशुवैद्यकीय अधिकारी

कुत्र्यांचे आरोग्य तपासणे आणि लसीकरण करणे; दुरुस्त किंवा अपायकारक कुत्र्यांना सुरक्षित रीतीने हाताळणे; सार्वजनिक ठिकाणी मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करणे सध्याची परिस्थिती: संबंधित प्रशासनाकडे शाळा, रस्ते आणि पोलीस स्टेशनसारख्या ठिकाणी कुत्र्यांचा नियंत्रण नसल्याने नागरिक भयभीत आहेत. तातडीने कारवाई करणे आवश्यक, अशी नागरिकांची मागणी आहे.

तात्काळ उपाययोजना आवश्यक नागरिकांची मागणी

मोकाट कुत्र्यांवर तातडीने नियंत्रण ठेवावे, पकड मोहीम राबवावी, आणि भविष्यातील अपघात टाळण्यासाठी कायमस्वरूपी नियोजन करावे. ''आज आवाज न उठवला तर उद्या उशीर होईल,'' असे इशारे स्थानिक नागरिकांनी दिले आहेत. डोणगाव बोलतंय प्रशासन ऐकणार आहे का?

05 Jan 2026 - Page 4 | www.aapalavidarbh.com
Powered by softisky | 9764331134

होता.

या पार्श्वभूमीवर गट विकास अधिकारी पंचायत समिती मेहकर यांनी काढलेल्या पत्रात स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत की, ''ग्रामपंचायत डोणगाव अंतर्गत मोकाट कुत्र्यांमुळे निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणावर तात्काळ उपाययोजना करून बंदोबस्त करावा.''




सदर पत्राची प्रत थेट मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांच्याकडे पाठवण्यात आल्याने प्रशासनावर अधिक दबाव निर्माण झाला आहे.

**नागरिकांचे म्हणणे आहे की,**


**''दैनिक आपला विदर्भने आवाज उठवला नसता, तर प्रशासन आजही गाफीलच राहिले असते.''**

**आता प्रश्न एवढाच आहे की, फक्त पत्रापुरती कारवाई होणार, की प्रत्यक्षात कुत्र्यांची पकड मोहीम सुरू होणार?**




**दैनिक आपला विदर्भ जनतेचा आवाज, प्रशासनावर दणका!**

दरम्यान, शेतकरी क्रांतिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांनी या प्रकरणी दैनिक आपला विदर्भचे जाहीर आभार मानले. मोकाट कुत्र्यांच्या दहशतीविरोधात आवाज



उठवून प्रशासनाला जागे केल्याबद्दल त्यांनी दैनिक आपला विदर्भची भूमिका कौतुकास्पद असल्याचे सांगितले. तसेच डॉ. टाले यांनी आज असंख्य कार्यकर्त्यांसह पंचायत समिती मेहकर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून संबंधित अधिकाऱ्यांसमोर नागरिकांच्या समस्या ठामपणे मांडल्या. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच प्रशासनाकडून ग्रामपंचायत डोणगाव यांना मोकाट कुत्र्यांवर तातडीची व योग्य कारवाई करण्याबाबतचे लेखी आदेश काढण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. ''ही केवळ सुरुवात आहे. प्रत्यक्षात कारवाई होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही,'' असा इशाराही डॉ. टाले यांनी यावेळी दिला.

## राज्यपालांचे ममतांच्या कारभारावर बोट...

प. बंगालसह देशाच्या विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात घुसखोरी होताना दिसून येत आहे. सीमावर्ती राज्यांमध्ये अशी घुसखोरी मोठ्या प्रमाणात होते, हे सांगायलाच नको. प. बंगालचे राज्यपाल सी.व्ही. आनंद बोस यांनी राष्ट्रीय-सुरक्षेचा विचार करता, घुसखोरी हा 'अत्यंत चिंतेचा विषय' असल्याचे म्हटले आहे. या घुसखोरीला रोखण्यासाठी आपली सीमा-सुरक्षा दले आणि गुप्तचर यंत्रणा सक्षम असल्याचे सांगतानाच, प. बंगालमधील पोलिसांच्या विश्वासार्हतेबद्दल राज्यपालांनी तीव्र चिंताही व्यक्त केली. राज्यपाल बोस यांचे हे वक्तव्य पाहता, त्यांनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या कारभारावरच बोट ठेवले आहे. प. बंगालमधील पोलीस दलासंदर्भात बोलताना राज्यपाल बोस म्हणाले की, ''आपण पोलीस स्टेशनमध्ये गेलो तर आपणास न्याय मिळेल, असे जनतेला वाटायला हवे. पण, दुर्दैवाने प. बंगालमध्ये तशी स्थिती नाही. बंगालमध्ये पोलिसांची विश्वासार्हता वादग्रस्त आहे. पोलिसांचा एक गट गुन्हेगारी कारवायांमध्ये, दुसरा गट भ्रष्टाचारी आणि तिसरा गट राजकारणाने प्रभावित आहे. लोकशाही व्यवस्थेचा विचार करता हे चांगले चिन्ह नाही,'' असेही त्यांनी सांगितले. आपण सर्वच राजकीय पक्षांसाठी उपलब्ध असतो असे सांगून ते म्हणाले की, ''मध्यंतरी काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी, काही पक्ष प्रतिनिधींसमवेत आपल्याला भेटले. त्यांना पुन्हा आपली भेट घ्यायची असेल, तर त्यास आपली तयारी आहे. आपण सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना भेटीसाठी वेळ देत असतो. मी कोलकात्यामध्ये असताना कोणास भेट हवी असल्यास, १२ तासांच्या आत त्यांना भेट मिळू शकते,'' असेही राज्यपालांनी स्पष्ट केले. बांगलादेशच्या संदर्भात राज्यपालांना विचारले असता, ''हा केंद्र सरकारच्या कक्षेतील विषय असल्याने, त्यामुळे त्यावर बोलणे योग्य ठरणार नाही. हा सर्व अत्यंत संवेदनशील विषय असून, परराष्ट्र मंत्रालय तो हाताळत आहे. ते मंत्रालय आपले काम चोखपणे करीत आहे. अन्य देशाशी संबंधित असा हा विषय असल्याने, राज्यपाल या नात्याने त्यावर आणखी भाष्य आपण करू इच्छित नाही.'' दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अलीकडेच कोलकाता येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये, ममता बॅनर्जी यांच्या सरकारवर जोरदार टीका केली होती. गेली १५ वर्षे प. बंगाल भीती, भ्रष्टाचार आणि घुसखोरीचा बळी ठरला आहे. प. बंगालमध्ये २०२६मध्ये भाजपचे सरकार आल्यानंतर घुसखोरीला पायबंद घातला जाईल, विकासाला गती दिली जाईल आणि बंगालचा सांस्कृतिक वारसा पुनरुज्जीवित केला जाईल, असे अमित शाह यांनी स्पष्ट केले. तर दुसरीकडे ममता बॅनर्जी यांनी, ''आपल्या इच्छेविरुद्ध अमित शाह हे बंगालमध्ये प्रवेश करू शकत नाहीत. तसे आपण ठरविले तर ते हॉटेलच्या बाहेर पाऊलही टाकू शकणार नाहीत,'' असे जे वक्तव्य केले होते, त्यावर भाजपने जोरदार टीका केली आहे. ममता बॅनर्जी यांचे वक्तव्य हा भारतीय लोकशाही आणि संघराज्य व्यवस्थेवरचा घाला असल्याची टीका, भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते गौरव भाटिया यांनी केली आहे. एकूणच, गृहमंत्री अमित शाह यांचे वक्तव्य ममता बॅनर्जी यांना अत्यंत झोंबल्याने, त्या अशी आक्रस्ताळी भाषा बोलत आहेत असे म्हणता येईल. मणिपूर भागातील 'चीन कुकी झो' संघटना आणि त्यांच्या नेत्यांनी स्वतंत्र, सार्वभौम असा प्रदेश त्यांना मिळायला हवा अशी मागणी सार्वजनिकरित्या केली आहे. कुकींनी मागणी केलेल्या या प्रदेशास 'कुकीलॉण्ड', 'झोलॉण्ड' किंवा 'झोगाम' असे नाव देण्याचा, कुकी संघटनांचा मानस आहे. तसेच काही कुकी गटांनी विदेशी सरकारे आणि संयुक्त राष्ट्रांशी संपर्कही साधला आहे. कुकी गटांनी अन्य देशांशी आणि संयुक्त राष्ट्रांशी संपर्क साधल्याबद्दल, 'मैतेई' गटांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. तशा आशयाचे एक निवेदनही विविध मैतेई गटांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर केले आहे. या निवेदनात कुकी बंडखोर गटांच्या विविध कारवायांचीही माहिती देण्यात आली आहे. कुकी गटांनी यासंदर्भात अन्य देशांशी किंवा संयुक्त राष्ट्रांशी जो पत्रव्यवहार केला आहे, त्याच्या प्रतीही सार्वजनिकरित्या वितरित केल्या आहेत. कुकी गटांनी जी पत्रे पाठविली आहेत, त्यामध्ये 'राष्ट्रीय हरित लवादा'च्या आदेशाला आव्हान देण्यात आले असून, मणिपूरच्या डोंगराळ भागातून जो बेकायदेशीर मार्ग बांधला जात आहे, त्या रस्त्याचे काम त्वरित थांबविण्यात यावे, असा आदेश 'राष्ट्रीय हरित लवादा'ने दिला होता. कोणतीही मान्यता नसताना आणि पर्यावरणीय खात्याची अनुमती न घेता, या रस्त्याचे बांधकाम केले जात होते. या रस्त्याचा 'जर्मन रोड' किंवा 'टायगर रोड' असा उल्लेख करण्यात येत आहे. 'चीन कुकी झो' अतिरेकी आणि अन्य सशस्त्र गट अमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी करण्यासाठी या मार्गाचा वापर करीत असल्याचे, मैतेई गटांनी आपल्या निवेदनामध्ये लक्षात आणून दिले आहे. अन्य देशांशी संपर्क साधून कुकी गटांनी भारताच्या सार्वभौमत्वास आव्हान दिले आहे. तसेच कुकी गटांनी असे करून, भारताच्या न्यायव्यवस्थेलाही कमी लेखल्याचे मैतेई गटांनी निदर्शनास आणून दिले आहे. अशी पत्रे पाठवून 'चीन कुकी झो' गट घातक पायंडा पाडीत आहे, याकडे 'मैतेई' समाजाने लक्ष वेधले आहे. यापूर्वीही 'चीन कुकी झो' संघटना आणि त्यांच्या नेत्यांनी अमेरिका, संयुक्त राष्ट्रे यांसह अन्य काही देशांशी संपर्क साधला होता. कुकी गटांना विदेशी ख्रिश्चन संघटनांकडून आर्थिक मदत मिळत असल्याचा उल्लेख मैतेई गटांनी आपल्या निवेदनात केला आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन आणि राष्ट्रीय-सुरक्षेचा विचार करून 'चीन कुकी झो' अतिरेयांच्या विरुद्ध जी कारवाई थांबविण्यात आली, त्याचा पुनर्विचार करावा; असे आवाहन 'मैतेई' समाजाने आपल्या निवेदनाद्वारे पंतप्रधान मोदी यांना केले आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी मार्च २०२६पर्यंत देशातून लाल दहशतवादाचे उच्चाटन केले जाईल, असे घोषित केले आहे. त्यानुसार, देशाच्या विविध भागांमधून नक्षलवाद्यांचे उच्चाटन करण्याची जोरदार मोहीम हाती घेण्यात आली. या मोहिमांना विविध राज्यांमध्येही चांगले यश मिळत असल्याचे दिसून येत आहे. अनेक कुप्रसिद्ध नक्षलवादी पोलिसांना शरण येत आहेत, तर काहींचा चकमकीत खात्माही झाला आहे. छत्तीसगढ राज्यातील बस्तर भाग हा एकेकाळी नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला मानला जात असे. त्या भागात जणूकाही त्यांचेच राज्य चालत असे पण, शासनाने हाती घेतलेल्या मोहिमांमुळे त्या आणि अन्य भागातील नक्षलवाद्यांचे कंबरडेच मोडले आहे. लाल दहशतवादाविरुद्ध बस्तर भागात सुरक्षा दलांनी ज्या मोहिमा हाती घेतल्या होत्या, त्या मोहिमांना अत्यंत चांगले यश मिळाले आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ सालामध्ये बस्तर भागात सुरक्षा दलासमवेत झालेल्या चकमकीत २५६ नक्षलवादी मारले गेले; तर त्याच वर्षामध्ये एक हजार, ५०० माओवाद्यांनी शरणागतीही पत्करल्याची माहिती पोलीस महासंचालक सुंदरराज यांनी अलीकडेच दिली. ज्या नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे, त्यांचे पुनर्वसन करण्याचे कार्य वेगाने सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

# पंतप्रधान मोदी म्हणाले की, सर, मी तुम्हाला भेटू शकतो का?, डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा



**नवी दिल्ली** : अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यांच्या वेगवेगळ्या विधानांमुळे नेहमीच चर्चेत असतात. नुकतेच ट्रम्प यानी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या चर्चेबद्दल एक मोठे विधान केले आहे. भारताच्या प्रलंबित संरक्षण खरेदी आणि व्यापारासंबंधी अडथळ्यांच्या मुद्द्यावर, ज्यामध्ये अपाचे (अज्रम्प) हेलिकॉप्टरच्या डिलिव्हरीला होत असलेल्या उशरासंबंधी मुद्द्यांवर चर्चे साठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: त्यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना 'सर' म्हणून संबोधित केले.

हाऊस जीओपी मेंबर रिट्रिट येथे बोलतना ट्रम्प म्हणाले की, ''भारताने अपाचे हेलिकॉप्टर्स मागवले होते आणि त्यांना ते ५ वर्षापासून मिळाले नाहीत. पंतप्रधान मोदी मला भेटायला आले. सर, मे आय सी यू प्लिज? येस! (सर, प्लिज मी तुम्हाला भेटू शकतो का?)'' पुढे बोलताना ट्रम्प यांनी मोदींबरोबर असलेल्या चांगल्या संबंधांबद्दलही भाष्य केले. ते म्हणाले ''माझे त्यांच्याबरोबर (मोदी) अत्यंत चांगले संबंध आहेत.''

मात्र ट्रम्प यांनी दावा केला की, पंतप्रधान मोदी हे टॅरिफच्या मुद्द्यावर नाराज आहेत. ''ते माझ्यावर फारसे खुश नाहीत, कारण तुम्हाला माहिती आहे, सध्या त्यांना खूप जास्त टॅरिफ भरावे लागत आहेत. कारण त्यांनी (रशियाकडून) तेलाची खरेदी थांबवली नाही,'' असे ट्रम्प म्हणाले. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे मोठ्या प्रमाणावर कमी केल्याचा उल्लेखही त्यांनी पुढे बोलताना केला. ट्रम्प म्हणाले की, ''पण करत आहेत, जसे की तुम्हाला माहिती आहे त्यांनी रशियाकडून तेल खरेदी मोठ्या प्रमाणात कमी केली आहे.''

अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवरील टॅरिफच्या परिणामाबद्दल बोलताना ट्रम्प म्हणाले की, ''तसे पाहता, टॅरिफमुळे आपण श्रीमंत होत आहोत. आशा आहे की हे सगळ्यांच्या लक्षात येत असावे.'' पुढे त्यांनी दावा केला की, ''मी हे सांगतले पाहिजे की या टॅरिफमुळे आपल्या देशात ६५० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम आली किंवा ती लवकरच येईल.''

या आठवड्याच्या सुरुवातीला डोनाल्ड ट्रम्प यांनी एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांशी बोलत असताना भारतावर टॅरिफ लावण्याबद्दलचा पुनरुच्चार केला होता. ''जर भारताने रशियन तेलाच्या आयातीवर मदत केली नाही तर आम्ही त्यांच्यावर आणखी टॅरिफ वाढवू शकतो'', असे ट्रम्प यांनी रविवारी सांगितले होते.

याबरोबरच ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक करताना भारत आपल्या सूचनांवर सकारात्मक विचार करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ते म्हणाले, ''पंतप्रधान मोदी एक चांगले व्यक्ती आहेत. मी खूश नाही, हे त्यांना चांगले माहीत आहे. मला खूश ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. ते आमच्याशी व्यापार करतात आणि आम्ही लवकरच त्यांच्यावर आणखी टॅरिफ लादू शकतो.''

## मुक्ता बर्वे ची नव्या वर्षाची खास भेट, माया चित्रपट यादिवशी येतोय भेटीला

**मुंबई /प्रतिनिधी** : मुक्ता बर्वे नव्या वर्षात तिच्या चाहत्यांसाठी खास भेट घेऊन येत असून 'माया' हा तिचा आगामी चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेची घोषणा झाल्यानंतर सिनेरसिकांमध्ये उत्सुकता वाढली असून मुक्ताच्या दमदार भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठी सिनेसृष्टीतील दमदार अभिनयासाठी ओळखली जाणारी अभिनेत्री मुक्ता बर्वे पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाली आहे. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच ती तिच्या चाहत्यांसाठी खास भेट घेऊन येत असून तिचा आगामी चित्रपट 'माया' लवकरच प्रदर्शित होणार आहे. 'माया' चित्रपटात नक्की काय पाहायला मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुक्ताने यापूर्वी अनेक वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या आहेत. प्रत्येक भूमिकेत ती परफेक्ट बसते. त्यामुळे 'माया'मध्ये ती नेमकी कोणत्या भूमिकेत दिसणार, याबाबत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.

शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स निर्मित 'माया' या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. दिग्दर्शन आदित्य इंगळे यांचे, डॉ. सुनील दातार, अलका मधुकर दातार यांची निर्मिती आहे. माया हा चित्रपट येत्या २७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे.

पान १ वरून...

## महाराष्ट्रात गुंडाराज, कायदा-सुव्यवस्था बिघडली

युती झाल्याच्या चर्चावर हर्षवर्धन सपकाळ यांनी ठाम शब्दांत भूमिका मांडली. ''काँग्रेसचे भाजपासोबत कुठंही, कोणत्याही स्तरावर गठबंधन नाही,'' असं हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केलं. तसंच अशा अफवा जाणीवपूर्वक पसरवण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला. याचबरोबर, ''देवेंद्र फडणवीस हेच गृहमंत्रिपदाचा कार्यभार सांभाळत आहेत. त्यामुळं राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नसल्याने कायदा-सुव्यवस्थेची स्थिती अधिकच बिघडली आहे. गृहखात्यावर लक्ष केंद्रीत न केल्यामुळं गुन्हेगारीवर अंकुश राहिलेला नाही,'' असंही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार : दरम्यान, बिनविरोध निवडणुकांबाबत बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. निर्विरोध निवडणुका होणं ही लोकशाहीची विकृती असल्याचं सांगत त्यांनी याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचं स्पष्ट केलं. ''ज्या ठिकाणी निर्विरोध निवडणुका झाल्या आहेत, त्या रद्द करून तिथं ईव्हीएमद्वारे पुन्हा निवडणूक घ्यावी आणि जनतेला म तदानाचा अधिकार मिळावा,'' अशी ठाम मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

# 'मास्टर की' वापरून महिला ग्राहकाच्या खोलीत प्रवेश; पंचतारांकित हॉटेलला १० लाखांचा दंड

**चेन्नई :** हॉटेलमध्ये मुक्कासाला असलेल्या ग्राहकाच्या गोपनीयतेच्या अधिकाराचा आदर करणे हे व्यवस्थापनाचे कर्तव्य आहे, असे स्पष्ट करत चेन्नई येथील ग्राहक मंचाने उदयपूरमधील प्रसिद्ध 'लीला पॅलेस' हॉटेलला मोठा झटका दिला आहे. हाऊसकीपिंग कर्मचाऱ्याने 'मास्टर की'चा वापर करून महिला ग्राहकाच्या खोलीत अनधिकृत प्रवेश केल्यामुळे, हॉटेलला १० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**नेमके प्रकरण काय?**

संबंधित महिला तक्रारदार या २६ जानेवारी २०२५ रोजी उदयपूर येथील 'लीला पॅलेस' हॉटेलमध्ये वास्तव्यास होत्या. त्या खोलीत असतानाच, हॉटेलच्या हाऊसकीपिंग कर्मचाऱ्याने कोणत्याही परवानगी आणि पूर्वसूचनेशिवाय शिवाय 'मास्टर की' वापरून थेट खोलीत प्रवेश केला. हॉटेल कर्मचाऱ्याच्या या कृतीमुळे आपल्या गोपनीयतेचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा भंग झाल्याचा दावा करत महिलेने चेन्नई जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे धाव घेतली होती.

**ग्राहक मंचाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण**

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान हॉटेल व्यवस्थापनाने असा युक्तिवाद केला की, अंतर्गत कार्यपद्धतीनुसार कर्मचाऱ्याने खोलीत प्रवेश केला होता. मात्र, ग्राहक मंचाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. 'केवळ हॉटेलच्या अंतर्गत नियमांचे कारण देऊन हाऊसकीपिंग कर्मचारी पाहुण्यांच्या खोलीत मास्टर की वापरून प्रवेश करू शकत नाहीत. असे करणे म्हणजे सेवेतील त्रुटी असून ग्राहकाच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे गंभीर उल्लंघन आहे,' असे निरीक्षण आयोगाने नोंदवले.

**दंडात्मक कारवाई**

ग्राहक मंचाने हॉटेलला आदेश देत म्हटले की, पीडित महिलेला झालेल्या मानसिक आणि आर्थिक त्रासाबद्दल १० लाख रुपये भरपाई द्यावी. खोलीचे ५५,५०० रुपये हे संपूर्ण भाडे २६ जानेवारी २०२५ पासून ९ टक्के व्याजासह परत करावे. तक्रारदाराला खटल्याच्या खर्चापोटी १०,००० रुपये द्यावेत.

**हॉटेल क्षेत्रासाठी मोठा धडा**

हा निकाल हॉटेल उद्योगासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अनेकदा हॉटेल कर्मचारी साफसफाई किंवा देखभालीच्या नावाखाली ग्राहकांच्या खोलीत प्रवेश करून हस्तक्षेप करतात. मात्र, ग्राहकाच्या संमतीशिवाय असे करणे बेकायदेशीर ठरू शकते, हे या निकालाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

# हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड मधील भव्य कार्यक्रम यशस्वी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी

## कार्यक्रमासाठी सुरक्षा यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना – सचिव रुचेश जयवंशी

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/नांदेड :** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाचे सर्वांगीण व काटेकोर नियोजन करण्यात यावे. देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावरून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असून, त्यांच्या सुरक्षा, वाहतूक, वैद्यकीय सेवा व मूलभूत सोयी-सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दिल्या.

नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या या भव्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीस अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, राज्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीव्दारे छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव, जळगाव, धुळे, नंदूरबार जिल्हयाचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालीका आयुक्त, शिक्षण, परिवहन, अल्पसंख्याक विभागाचे वरिष्ठ अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्रीकर परदेशी म्हणाले की, या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदाय एकत्र येणार आहेत. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या त्याग, बलिदान व मानवतेसाठी दिलेल्या शहीदीचा इतिहास देश-विदेशात पोहोचवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी २६ विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सुमारे १० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन चोख सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, वाहतूक नियोजन, निवास व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा आदी मूलभूत सुविधा पुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

व महाविद्यालयांमध्ये निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच भाविकांच्या सोयीसाठी ://. या संकेतस्थळावर रस्ते, रेल्वे, बस, वाहतूक व्यवस्था तसेच कार्यक्रमासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समितीच्या समन्वयाने सर्व यंत्रणांनी आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी सचिव रुचेश जयवंशी यांनी सांगितले की, मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे, महानगरपालिका, शाळा-महाविद्यालये, पोलीस यंत्रणा व परिवहन विभागाने समन्वयाने काम करत भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच सुरक्षेच्या दृष्टीने काटेकोर कार्यवाही करावी. रामेश्वर नाईक म्हणाले की, श्री गुरु तेग बहादुर यांनी राष्ट्र व संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान सर्वसामान्य जनतेपर्यंत, विशेषतः गावपातळीवर विविध उपक्रमांच्या माध्यमातून पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वोत्तम संस्था आणि विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. असेही त्यांनी सांगितले.

''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागमाच्या यशस्वी भव्य आयोजनासाठी नांदेड जिल्हा प्रशासनामार्फत एकूण २५ समित्या स्थापन करण्यात आल्या असून प्रत्येक समिती प्रमुखांवर जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. सर्व यंत्रणा समन्वयाने कार्यरत असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. शहीदी समागम कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी यावेळी दिली.

सदर बैठकीसाठी दुरदृश्य प्रणालीव्दारे नांदेड येथून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे कार्यकारी अधिकारी व शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, गुरुद्वारा बोर्डाकडून अधीक्षक हरजितसिंघ कडेवाले यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, मुख्य कार्यक्रम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर होणार असून मैदानाचे सपाटीकरण व स्वच्छतेच्या कामासह मुख्य पेंडाल उभारणीसाठी आवश्यक सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. विद्युत व पाणीपुरवठ्याची व्यवस्था आज पूर्ण करण्यात येणार आहे. भाविकांसाठी जिल्हानिहाय पार्किंगची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून निवासासाठी शहरातील शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाहतूक व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करण्यात आले असून आवश्यक वाहनांची व्यवस्था देखील करण्यात येत आहे. नांदेड हे रेल्वेमार्गावर असल्याने रेल्वे विभागाच्या सहकार्याने अधिकाधिक भाविकांना रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. लंगर, निवास व वाहतूक व्यवस्थेचा दैनंदिन आढावा घेतला जात असून आरोग्य सेवांसाठी ७२ रुग्णालयांमार्फत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कार्यक्रमस्थळी विविध आरोग्य स्टॉल उभारण्यात येणार आहोत. स्वच्छतेसाठी सध्या १०० शौचालयांची व्यवस्था उपलब्ध आहे. यासाठी इतर जिल्ह्यांचेही सहकार्य घेतले जाणार आहे. कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी विविध शाळांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून येत्या १५ जानेवारीपासून प्रभातफेऱ्या काढण्यात येणार आहेत. तसेच होर्डिंग्सद्वारे मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरक्षा व्यवस्था, पार्किंग व सुरक्षा पासेस याबाबतच्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# रवींद्र चव्हाणांची चूक लातूरमध्ये जाऊन सुधारली, फडणवीस म्हणाले, आमची लढाई काँग्रेसशी, पण विलासरावांबद्दल आम्हाला नितांत आदर

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी:** लातूरमधून विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील, असे वक्तव्य करुन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रचंड वाद आणि नाराजी ओढावून घेतली होती. रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेस पक्षाने त्यांच्याविरोधात टीकेची झोड उठवली होती. सर्वपक्षीय राजकारण्यांशी सलोख्याने वागणाऱ्या विलासराव देशमुख यांच्याबाबत रवींद्र चव्हाणांची भाषा महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाला फारशी पसंत पडली नव्हती. त्यामुळे या सगळ्याचे पडसाद लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत उमटण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी लातूरमध्ये झालेल्या सभेत या सगळ्या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. विलासराव देशमुख यांचा महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. त्यामुळे मला त्यांच्याविषयी नितांत आदर आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

लातूर ही एक अशी भूमी आहे की, जिने महाराष्ट्राला खूप मोठ्याप्रमाणावर नेतृत्व दिले. यामध्ये चाकूरकर साहेबांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी आपल्या राजकीय आयुष्यात नगराध्यक्षपदापासून ते लोकसभा अध्यक्ष, देशाचा गृहमंत्री असा प्रवेश केला. राजकारणात अशाप्रकारचे लोक आपल्याला



विरळ दिसतात. त्याचप्रमाणे शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब असतील किंवा ज्यांनी या लातूरला एक वेगळी ओळख असतील ते माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख असतील. खऱ्या अर्थाने विलासरावजी देशमुख हे एक असे नाव आहे, जे पक्षाच्या पलीकडे जाऊन या महाराष्ट्राच्या जडघडणीत मोलाचा वाटा आहे म्हणून आपण त्यांचा आदर करतो. हे सांगताना माझ्या मनात कुठलाही संकोच नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

दोन दिवसांपूर्वी याठिकाणी काही संभ्रम निर्माण झाला, गोंधळ झाला. आमचे अध्यक्ष याठिकाणी आले होते. त्यांना बोलायचं होतं, राजकीयदृष्ट्या आपल्याला नवीन रेकॉर्ड तयार करायचाय. पण कदाचित त्यांचे शब्द चुकीच्या पद्धतीने गेले असतील, याबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. पण मी जाहीरपणे सांगतो, आमची लढाई काँग्रेस पक्षाशी असली तरी विलासराव देशमुखांबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. ते या महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे नेते होते, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्यानंतर आता दुखावले गेलेले लातूरकर शांत होणार का, हे बघावे लागेल.

## व्हेनेझुएला – अमेरिका संघर्षावर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी स्पष्ट केली भारताची भूमिका

**नवी दिल्ली :** भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी व्हेनेझुएलातील परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. भारताचे व्हेनेझुएलाबरोबर बऱ्याच वर्षापासून चांगले संबंध आहेत, असे एस. जयशंकर म्हणाले. लक्झेंबर्ग मधील एका कार्यक्रमात एस. जयशंकर यांनी अमेरिका व व्हेनेझुएलामध्ये सुरू असलेल्या संघर्षावर मंगळवारी विधान केले. दोन्ही देशांनी एकत्र बसून या समस्येवर तोडगा काढला पाहिजे, असे आवाहन एस. जयशंकर यांनी केले आहे. ३ जानेवारीला रात्री अमेरिकेने व्हेनेझुएलावर हवाई हल्ला केला. तसेच व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सीलिया फ्लोरेस यांना अटक करून न्यूयॉर्कला नेले.

एस. जयशंकर म्हणाले, ''मला वाटतं काल (सोमवारी) आम्ही याबाबत एक निवेदन जारी केलं. व्हेनेझुएलातील बदलत्या परिस्थितीबाबत आम्हाला चिंता आहे. व्हेनेझुएलाशी संबंधित सगळ्यांनी बसून चर्चा करायला हवी. चर्चेतून या समस्येवर तोडगा काढायला हवा. जो व्हेनेझुएलातील नागरिकांच्या हिताचा असेल. तसेच त्यांना सुरक्षा प्रदान करेल. अखेर आमच्यासाठी तेच महत्वाचं आहे.'' एस. जयशंकर यांनी व्हेनेझुएलातील नागरिकांचे हित व सुरक्षा भारतासाठी महत्वाची असल्याचे म्हटले आहे.

एस. जयशंकर म्हणाले, ''भारताला व्हेनेझुएला एक देश म्हणून हवा आहे. व्हेनेझुएलाशी आमचे खूप वर्षापासून चांगले संबंध आहेत. व्हेनेझुएलातील परिस्थिती कशीही असली तरी तिथल्या नागरिकांना घराबाहेर पडता आले पाहिजे'' दरम्यान, परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी एक निवेदन जारी केले आहे.

व्हेनेझुएलातील बदलत्या परिस्थितीबाबत भारताला चिंता असून त्याकडे भारत बारीक लक्ष ठेवून असल्याचे निवेदनात नमूद होते.

''व्हेनेझुएलातील नागरिकांची सुरक्षा व हित जोपासण्याला भारताचा पाठिंबा आहे. या समस्येवर चर्चेतून शांततेत तोडगा निघावा, तसेच त्या भूभागात शांतता व स्थिरता यावी अशी भारताला अपेक्षा आहे. कराकस मधील भारतीय दूतावास व्हेनेझुएलातील भारतीयांच्या संपर्कात आहे. त्यांना शक्य तेवढी मदत पुरवली जाईल.'', असे परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात नमूद करण्यात आले होते. गरज नसल्यास भारतीयांनी व्हेनेझुएलात जाणे टाळावे, असे आवाहन परराष्ट्र मंत्रालयाने भारतीयांना केले आहे.

मादुरो अमेरिकन न्यायालयात काय म्हणाले ?

व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांनी अमेरिकेतील न्यायालयात निष्पाप असल्याचे म्हटले आहे. ''मी एक प्रामाणिक व्यक्ती आहे. मी माझ्या देशाचा राष्ट्राध्यक्ष आहे. निष्पाप आहे. माझ्यावर केलेल्या आरोप मला मान्य नाहीत. मी दोषी नाही.'', असे निकोलस मादुरो न्यायालयात म्हणाले. ड्रग्ज तस्करी, नार्को-दहशतवाद, तसेच अमेरिकेत मोठ्या प्रमाणात कोकेन हे ड्रग्ज पाठवल्याचा आरोप मादुरो यांच्यावर आहे. मादुरो यांच्या पत्नी सीलिया यांनीही आपण निष्पाप असल्याचे म्हटले आहे.

## पोलिसांनी विवस्त्र करुन मारहाण केली, भाजप महिला कार्यकर्तीचा आरोप; व्हिडिओवर आयुक्तांकडून स्पष्टीकरण

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राजकारणात एकमेकांवर आरोप करणे हे नित्याचे झाले असून निवडणूक प्रचारात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असतात. मात्र, राजकीय वादातून एक महिला कार्यकर्त्याच्या सांगण्यावरुन दुसऱ्या महिला कार्यकर्त्यास विवस्त्र करुन मारहाण केल्याची धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. पोलिसांनी महिला काँग्रेस कार्यकर्त्याच्या तक्रारीवरून आपल्याला अटक करुन पोलीस वाहनात विवस्त्र करून मारहाण केल्याचा आरोप महिला भाजप कार्यकर्त्याने केला आहे. सुजाता हंडी या भाजप कार्यकर्त्याने हुबळीतील केशवपूर पोलिसांवरच आरोप केला आहे. मात्र, संबंधित महिलेनं स्वत:च कपडे फाडून गोंधळ घातल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.हुबळीमधील चालुक्य नगर भागात निवडणूक मतदार यादीवरून काँग्रेस आणि भाजप कार्यकर्त्यात वाद झाला. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले. यावेळी सुवर्णा कलकुंटला या काँग्रेस नगरसेविकेने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन सुजाता हंडी आणि अन्य महिलांना ताब्यात घेतले.

## बीएमसी निवडणुकीत उलथापालथ, वॉर्ड २२६ मध्ये गेम फिरला, नार्वेकरांना निवडणूक जड? मनसेने खेळ बिघडवला

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबई महापालिका निवडणुकीत काही ठिकाणी चांगलीच उलथापालथ झाली आहे. बिनविरोध निवडणूक करण्यासाठी विरोधकांवर दबाव टाकल्याच्या आरोपाने दक्षिण मुंबईतील वॉर्ड क्रमांक २२६ मधील निवडणूक चांगलीच चर्चेत आली आहे. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे बंधू आणि भाजपचे मकरंद नार्वेकर हे या वॉर्डमधील उमेदवार आहेत. या वॉर्डमधील राजकीय समीकरणे चांगलीच बदलली असून मनसेच्या एका डावाने सगळा खेळ बिघडला आहे.

मुंबईतील प्रभाग क्रमांक २२६ मध्ये एक अत्यंत दुर्मिळ आणि धक्कादायक चित्र पाहायला मिळत आहे. भाजपचे उमेदवार मकरंद नार्वेकर यांना रोखण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांनी सर्व मतभेद विसरून एका अपक्ष उमेदवाराला ताकद दिली आहे. अपक्ष उमेदवार तेजल पवार यांच्या पाठीशी मनसे, ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि वंचित बहुजन आघाडी असे सर्वच पक्ष उभे ठाकल्याने या प्रभागात हायव्होल्टेज ड्रामा सुरू झाला आहे. तेजल पवार यांना मनसेने पुरस्कृत केले असून शिवसेना ठाकरे गटाने पाठिंबा दिला आहे.

तेजल पवार यांच्या प्रचार रथावर राज ठाकरे, उद्धव ठाकरे, राहुल गांधी, शरद पवार, सोनिया गांधी, आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे या सर्व नेत्यांचे फोटो झळकत आहेत. एका अपक्ष उमेदवाराच्या प्रचारासाठी बॅनरवर सगळे नेते एकत्र आल्याने मतदारांच्या भुवया उंचावल्या आहेत.

## कार्तिक आर्यनसोबत डेटिंगच्या अफवांवर मिस्ट्री गर्लने केला खुलासा !

**मुंबई /प्रतिनिधी :** बॉलिवूडमध्ये अफवांचा बाजार चित्रपटांच्या बॉक्स ऑफिसपेक्षा कधी कधी वेगाने गाजतो आणि २०२६ हे वर्षही त्याला अपवाद ठरलेलं नाही. वर्षाच्या सुरूवातीसच अभिनेता कार्तिक आर्यनचं नाव चर्चेत आलं आहे, आणि तेही त्याच्या गोव्यातील काही फोटोमुळे. कार्तिकचा २०२५ साली रिलीज झालेला चित्रपट 'तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी' बॉक्स ऑफिसवर अपेक्षित प्रतिसाद देऊ शकला नाही, तरीही कार्तिक अजूनही लाइमलाईटमध्ये आहे त्याचे नाव आता त्याच्या पर्सनल लाईफमुळे चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांत कार्तिकने सोशल मीडियावर गोव्यातील व्हेकेशनचे फोटो शेअर केले. फोटोमध्ये कार्तिक समुद्रकिनारी आराम करत आणि चिल करत दिसतोय. मात्र, चाहत्यांची लक्ष वेधली गेली फोटोच्या बॅकग्राऊंडकडे. काही युजर्सनी असा दावा केला की कार्तिकच्या फोटोमधील सीन आणि एका मुलीच्या फोटोमध्ये खूप साम्य आहे. यामुळे त्याच्या डेटिंग लाइफबाबत चर्चा रंगली. ज्या मुलीशी कार्तिकचं नाव जोडलं जात आहे, तिचं नाव करीना कुबिलियूते असं सांगितलं जात आहे. रिपोर्ट्सनुसार करीना ग्रीसची असून सध्या यूकेमध्ये शिक्षण घेत आहे. सोशल मीडियावर चाहत्यांनी दोन्ही फोटोंमधील समुद्राचा अँगल, बेडची जागा, समुद्रकिनाऱ्यावरील फ्रेम आणि अगदी टॉवेलची स्थिती यांची तुलना केली. या तुलना इंटरनेटवर जलद व्हायरल झाली आणि अफवा अधिकच गाजू लागल्या.

रेडिट आणि इंस्टाग्रामवर या चर्चेला जोर मिळाला. काही युजर्स म्हणाले की कार्तिकने करीना इन्स्टाग्रामवर फॉलो केलं होतं, पण अफवा सुरू झाल्यानंतर त्याने तिला अनफॉलो केलं. अनेक चाहत्यांनी अंदाज व्यक्त करत, ''कदाचित काही सुरू आहे का?'' असा प्रश्न उपस्थित केला. मात्र, या प्रकरणावर कार्तिक किंवा करीना यांच्याकडून आधीपर्यंत अधिकृत स्टेटमेंट आलेले नव्हते, ज्यामुळे ''मिस्ट्री गर्ल'' अफवांना अधिक गती मिळाली होती.

## टेरेसवर अँटेना असलेल्या सोसायटींबाबत मुंबई उच्च न्यायालयाचा महत्वाचा निकाल!

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाने महत्वाचा निकाल दिला आहे. केवळ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या टेरेसवर दूरसंचार कंपनीचा अँटेना बसवण्यात आल्यामुळे संबंधित सोसायटीला औद्योगिक विवाद कायदा किंवा महाराष्ट्र दुकाने व आस्थापना कायद्यांतर्गत 'उद्योग' अथवा 'आस्थापना' म्हणून घोषित करता येत नाही. असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. सोसायटीच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी कर्मचारी नेमण्यात आले असले, तरी त्यामुळे संस्थेचे मूलभूत स्वरूप बदलत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.




न्यायमूर्ती संदिप मारणे यांच्या एकलपीठाने हा निर्णय देत कामगार न्यायालयाचा पूर्वीचा आदेश रद्द केला. या प्रकरणात एका सहकारी गृहनिर्माण संस्थेतील व्यवस्थापकाने स्वत:ला औद्योगिक विवाद कायद्यांतर्गत संरक्षण मिळावे, यासाठी दावा दाखल केला होता. सोसायटीच्या टेरेसवर दूरसंचार अँटेना बसवण्यात आल्याने संस्था व्यावसायिक स्वरूपाची ठरते आणि त्यामुळे ती उद्योग समूहात मोडते, असा युक्तिवाद व्यवस्थापकाने केला होता.

संबंधित व्यवस्थापकाला सेवेतून अचानक काढून टाकण्यात आले होते. या कारवाईविरोधात त्याने कामगार न्यायालयात दाद मागितली होती. कामगार न्यायालयाने व्यवस्थापकाचा दावा मान्य करत सोसायटी ही उद्योगाच्या व्याख्येत बसते, असा निष्कर्ष काढला होता. तसेच सोसायटीने व्यवस्थापकाला ग्रॅच्युइटीसह सुमारे ४.६ लाख रुपयांची थकीत देणी अदा करावीत, असे आदेश दिले होते. या निर्णयाला आव्हान देत सोसायटीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान सोसायटीच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, गृहनिर्माण संस्थेचा मुख्य उद्देश हा सदस्यांना निवास सुविधा पुरवणे हा आहे. टेरेसवर अँटेना बसवून मिळणारे भाडे हे केवळ पूरक स्वरूपाचे उत्पन्न असून, त्यामुळे सोसायटी व्यावसायिक किंवा औद्योगिक उपक्रम राबवत आहे, असे म्हणता येणार नाही. तसेच देखभाल, सुरक्षा किंवा व्यवस्थापनासाठी कर्मचारी नेमणे हे सोसायटीच्या स्वरूपात बदल करणारे नाही, असेही नमूद करण्यात आले.

न्यायालयाने या युक्तिवादाशी सहमती दर्शवली. न्यायालयाने स्पष्ट केले की, सहकारी गृहनिर्माण संस्था ही नफा कमावण्यासाठी स्थापन केलेली नसते. तिचा मुख्य उद्देश व्यावसायिक नाही. केवळ टेरेसवर दूरसंचार अँटेना बसवणे किंवा त्यातून भाडे मिळणे, यामुळे संस्था 'उद्योग' ठरत नाही. तसेच व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्त करणे ही बाब संस्थेच्या कायदेशीर स्वरूपावर परिणाम करत नाही, असेही न्यायालयाने ठामपणे सांगितले.

## शब्दकोडे क्र. 57



आडवे शब्द

१. निकट ४. हत्तीचे तोंड असलेला याअर्थी गणपतीचे नाव ८. पातक १०. राजा हरिश्चनचंद्राची पत्नी १२. नवरा १३. मनाला आलेला थकवा १५. संतोष १७. नंतर १८. अंधार १९. 'पॉवरलूम'ला मराठी शब्द २१. नूतन, जुनाच्या विरुद्ध २२. चांगले वर्तन २३. सवय, राबता २४. गाव, नगर २५. प्रजा २८. सगळीकडे २९. प्रयत्न ३१. मागे सरणे, माघार घेणे ३३. फार उष्ण वा थंड नसलेले ३५. माहीत असलेले ३६. मंदिराच्या शिखराचे टोक ३७. मादीच्या विरुद्ध ३८. हटकून ३९. चौक ४०. गाणे ४२. हाताचा प्रहार, मार ४३. स्वच्छ, चकचकीत ४८. सर्वात खालचे पाताळ ५०. एक श्वासरोग ५२. लोक ५३. विपुल प्रमाणात आढळणारा जलचर ५५. अस्थिर संपत्ती ५६. श्रीविष्णूचे नाव ५७. थोरवी ५८. खून ६०. साप, मुंगी यांचे घर ६१. पोते ६३. मेंढपाळ ६५. लागून, जवळ ६७. मधुमक्षिका ७०. रेती ७१. सुस्ती, कंटाळा ७३. थोर, मोठा ७५. संपणे ७६. वयाने थोराड नवरदेव ७९. मनाला टोचणारे दु:ख ८०. मुलाची मुलगी ८१. क्वचित ८२. रांग ८३. उच्च-नीच नसणे

उभे शब्द

१. समाजातील मतप्रवाह २. अत्यंत कपटी ३. सरळ, लांब बांबू ४. वेग ५. वार्तापत्र ६. डोळे ७. ऐटबाज ९. बाज, खाट ११. अधिक महिना १४. रम्य १६. संकटकाळी देवाला बोलावणे १७. असह्य वेदना २०. हरवलेले सापडणे २२. च्या बरोबर २४. लाज २५. धोबी २६. तमाशातील कलावंत २७. जाळणे २९. बुद्धी ३०. जप्ती ३२. शेंगेवरचे आवरण ३३. नाजूक ३४. पत्र ३८. ठेकेदार ३९अ. हिंदीत उद्योग, प्रताप ४१. अगदी त्याप्रमाणे ४४. समाचार ४५. राग, चीड ४६. सर्वस्व ४७. आईचा भाऊ ४९. समशेर ५१. चंगळ, विपुलता ५४. दक्ष ५६. वेदनेने ओरडणे ५९. श्रीमंत ६२. किंमत ६४. बेंड ६६. पक्ष्यांचा राजा ६८. हवेतील थंडावा, गारवा ६९. समोरासमोरची झुंज ७१. दर्पण ७२. बेकरीतील एक पदार्थ ७४. हस्त ७५. पावसाची झड ७६. घोटाळा ७७. धंद्यातील फायदा ७८. ढीग ७९. वर्ष, साल

### शब्दकोडे क्र. 56 चे उत्तर

कोडे क्र.७ चे उत्तर

आडवे उत्तर

१.अमर जवान ६.निकाल ९.सागरतट १२.जानवर १४.वराह १५.वासरू १६.मुरमाड १८.रमावर २०.नासका २१.माणूस २३.पाईक २५.नाथ २६.दर्या २७.कमाल किमान २९.पाय ३०.रम ३२.साय ३३.वासर ३४.मकरंद ३६.तनमनधन ३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन ४२.वामनावतार ४६.तर ४७.माय ४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण ५२.गतकाल ५४.रण ५५.रमा ५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू ६३.सन ६५.शेवट ६७.परवा ६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता ७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी ८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

उभे उत्तर

१.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर ५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर १०.गवार ११.रस १२.तरूणाई १६.मुकादम १७.मामा १९.वरमाय २२.समाधान २४.कदरदान २५.नायक २८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर ४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर ४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस ५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा ५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद ६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी ७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य ७९.रीत

# बिबी पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी

दैनिक आपला विदर्भ

**बिबी/प्रतिनिधी :** पत्रकार व प्रशासन यांच्यात योग्य समन्वय साधण्यासाठी बिबी परिसरातील पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी सर्वानुमते गठीत करण्यात आली आहे.

या कार्यकारिणीत अध्यक्षपदी ब्रह्मानंद वाकोडे, उपाध्यक्षपदी सुनील काकड तर सचिवपदी देवानंद सानप यांची निवड करण्यात आली. अनुभवी व अभ्यासू नेतृत्वाकडे संघटनेची धुरा दिल्यामुळे संघ अधिक सक्षम व प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, व्यावसायिक अडचणींचे निराकरण, पत्रकारांवरील अन्यायाविरोधात ठाम भूमिका तसेच सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या



प्रश्नांवर सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे.

या कार्यकारिणी व मार्गदर्शन मंडळात शरद गीते, काशिनाथ राऊत, मोहिते सर, सुनील इगळे, अशोक मुंढे, ऋषिकेश ददाले, जयजीत आडे, जहिरभाई कादिर शहा, मिलन चव्हाण, शिलवत इगळे, दिलीप राठोड, रमेश खडागळे, कृष्णा पधे, रामप्रसाद जाधव, रविंद्र पवार व गजानन डोईजड यांचा समावेश आहे.

## वृत्तविशेष...

### कोणता कुत्रा चावण्याच्या मनस्थितीत आहे, याचा अंदाज कसा लावणार?, भटक्या कुत्र्याया सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टाचा सवाल

**नवी दिल्ली :** कोणता कुत्रा कधी चावण्याच्या मनस्थितीत असेल याचा अंदाज बांधणे शक्य नाही, अशा शब्दात बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात परखड मत व्यक्त केले. तसेच शाळा, हॉस्पिटल किंवा न्यायालयात भटके कुत्रे का आहेत? अशा संवेदनशील परिसरातून त्यांना बाहेर काढण्यासाठी काय आक्षेप आहे, असाही सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला.

न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. खंडपीठाने म्हटले की, कोणता कुत्रा चावण्याच्या मनस्थितीत आहे आणि कोणता नाही, हे समजू शकणार नाही. त्यामुळे उपचारापेक्षा प्रतिबंध चांगला.

प्राणीमित्रांच्या याचिकाकर्त्यांचे वकील कपिल सिब्बल म्हणाले की, जो कुत्रा चावण्याची शक्यता आहे किंवा तो भुंकणारा असेल तर स्थानिकांनी त्या कुत्र्यासंदर्भात संबंधित केंद्राला माहिती द्यावी. केंद्राचे कर्मचारी सदर कुत्र्याला घेऊन जातील त्याचे लसीकरण व इतर उपचार करून त्याला पुन्हा त्याच परिसरात सोडतील. या युक्तीवादावर सर्वोच्च न्यायालयाने मिश्किल प्रतिक्रिया दिली. खंडपीठाने वकिलांना म्हटले की, 'बाहेर सोडल्यावर कुणाला चावू नकोस' असे त्या कुत्र्याचे समुपदेशन करण्याचा मुद्दा तुम्ही विसरलात.

जेष्ठ वकील कपिल सिब्बल यांना सुनावले

खंडपीठाने पुढे म्हटले की, कुत्रा फक्त चावतो किंवा रस्त्यावर एखाद्याचा पाठलाग करतो, एवढाच विषय नाही. तर यामुळे अपघातही होऊ शकतो. ज्या रस्त्यावर वाहने धावत असतात तिथून भटके कुत्रे पळत असतात. ही एक मोठी अडचण आहे. हा फक्त चावण्याशी संबंधित विषय नाही.यावर ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल म्हणाले की, पण भटके कुत्रे रस्त्यावर नाहीत तर कम्पाऊंडमध्ये आहेत. यावर खंडपीठाने त्यांना म्हटले की, तुमची माहिती फारच जुनी आहे. रस्त्यांवरून भटके कुत्रे हटवणे गरजेचे आहे. ते कदाचित चावा घेत नसतील पण त्यांच्यामुळे अपघात होऊ शकतो.

### महाराष्ट्राच्या राजकारणात धक्कादायक वळण, सत्तेसाठी भाजपची चक्क ओवेसींच्या एमआयएमशी युती!

**मुंबई /प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणात कधी न पाहिलं चित्र समोर आलंय. कट्टर हिंदुत्ववादी असलेल्या भाजपने सत्तेसाठी एमआयएमसोबत युती केल्याने आता राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाल्याचं पहायला मिळतंय. नुकताच नगपपंचायत आणि नगपालिका निवडणूक झाली. यातील अकोट नगरपालिकेत भाजपला बहुमत मिळालं नाही. मात्र, सत्तेत येण्यासाठी त्यांनी चक्क असुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमसोबत युती केली आहे.

भाजपने अकोट नगरपंचायतीमध्ये सर्वाधिक ११ जागा जिंकल्या मात्र, ३५ जागा असलेल्या नगरपंचायतीमध्ये त्यांना स्वबळावर सत्ता मिळाली नाही. सत्तेत येण्यासाठी त्यांना युतीची गरज होती. पण काय... भाजपने विरोधी पक्षात सर्वाधिक पाच जागा जिंकलेल्या एमआयएमशी हातमिळवणी केली अन् सत्तेच्या चाव्या घेतल्या. भाजपच्या नेतृत्वात अकोट विकास मंच स्थापन करण्यात आला होता. आता विरोधी पक्षातील एमआयएमलाच या विकास मंचात सामील करून घेण्यात आलं आहे.भाजपच्या आघाडीत ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि बच्चू कडूंचा प्रहार जनशक्ती पक्ष सहभागी आहे. अशातच आता एमआयएमची देखील एन्ट्री झाली आहे. अकोट नगरपालिकेत काँग्रेसचे ६ आणि वंचितचे २ सदस्य विरोधी पक्षात आहेत. विशेष म्हणजे भाजपने काँग्रेसला सोबत न घेता एमआयएमला टाळी दिल्याने आश्चर्य व्यक्त केलं जातंय.दरम्यान, मला अकोटमध्ये झालेल्या प्रकाराबद्दल माहिती नाही. मी तेथील प्रभारींना लिखित माहिती मागवली आहे. दहा मिनिटांमध्ये माहिती देण्याचं त्यांना सांगितला आहे त्यामुळे मी दहा मिनिटांनी आपल्या सोबत सविस्तर बोलतो. भाजपाच्या विरोधात आमचे राजकारण आहे आणि ते राहणारच, असं माजी खासदार इतिहास जलील यांनी म्हटलं आहे.

### पुण्यातील फिनिक्स मॉल प्रकल्पात मोठा झोल! मुंबईतील व्यावसायिकाची कोट्यवधींची फसवणूक, गंभीर आरोप

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील विमाननगर परिसरातील नामांकित 'इस्ट कोर्ट फिनिक्स मार्केट सिटी' मॉल प्रकल्पात गुंतवणुकीच्या नावाखाली मुंबईतील एका हॉटेल व्यावसायिकाची मोठी फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी फिनिक्स मिल्स लिमिटेड आणि वमोना डेव्हलपर्स प्रा. लि. या कंपन्यांच्या संचालकांसह एकूण १० जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुहू येथील रहिवासी किशोर बलराम निचाणी यांनी यासंदर्भात फिर्याद दिली असून, त्यावरून अतुल रुइया, गायत्री रुइया आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. निचाणी यांनी आपल्या रेस्टॉरंट व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी २०१२ मध्ये या मॉलमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधा आणि मोठ्या परताव्याचे आमिष दाखवण्यात आले होते. या विश्वासापोटी त्यांनी मॉलच्या दुसऱ्या मजल्यावरील १० युनिट्ससाठी सुमारे ३ कोटी ८५ लाख रुपये मोजले. मात्र, जागेचा प्रत्यक्ष ताबा मिळाल्यानंतर आर्किटेक्टमार्फत करण्यात आलेल्या मोजणीत मोठी तफावत आढळली. करारात नमूद केल्यापेक्षा १९३ चौरस फूट कमी जागा देण्यात आल्याचे समोर आले. याव्यतिरिक्त टेरेसची जागा आणि दीर्घकालीन भाडेकराराचे आश्वासन देऊनही विकासकांनी त्याची पूर्तता केली नाही.फसवणुकीचा हा प्रकार एवढ्यावरच मर्यादित राहिला नाही. प्रकल्पाचे अधिकृत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नसतानाही विकासकांनी बेकायदेशीरपणे मेंटेनन्स आणि कॉमन एरिया चार्जेसच्या नावाखाली सुमारे ४७ लाख रुपयांची अतिरिक्त वसुली केली. तसेच सोसायटीची नोंदणी न करणे आणि मंजूर नकाशापेक्षा वेगळे बांधकाम करणे असे गंभीर गैरप्रकार देखील निचाणी यांच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहेत.

## मुंबईत प्रदूषणावर कडक कारवाई : २३३ बांधकाम प्रकल्पांचे काम थांबवले

### उच्च न्यायालयाच्या फटकारणीनंतर महापालिकेचा धडाका; नियम डावलणाऱ्या ५५७ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील वायू प्रदूषणाबाबत उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर महापालिका प्रशासनाने प्रदूषण करणाऱ्या बांधकामांवर कडक निर्बंध लादले होते. त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या ५५७ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून २३३ प्रकल्पांचे काम थांबवण्याची अंतिम नोटीस देण्यात आली आहे.

ही कारवाई १ डिसेंबर ते ३१ डिसेंबरदरम्यान करण्यात आली आहे. ज्या क्षेत्रात दोनशेपेक्षा वर हवा गुणवत्ता निर्देशांक गेला, तर संबंधित क्षेत्रामधील बांधकामे थांबविण्यात येतील, तसेच प्रत्येक बांधकामांवर वायू गुणवत्ता मापन संयंत्रे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार आतापर्यंत एकूण १,०८० बांधकामस्थळी अशी संयंत्रे बसविली आहेत.

महापालिकेने वारंवार सूचना दिल्यानंतरही काही बांधकामांच्या



परिसरातील एक्यूआय दोनशेच्या वर राहिल्याने महापालिका प्रशासनाने ५५७ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. यातील २३३ बांधकामांना काम थांबवण्याच्या नोटिसा दिल्या आहेत.

सध्या मुंबईत एकूण २८ सतत वातावरणीय वायू गुणवत्ता सर्वेक्षण केंद्रे आहेत. ही केंद्रे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मोजमाप, कॅलिब्रेशन, गुणवत्ता हमी आणि डेटा प्रमाणीकरणासाठी राष्ट्रीय माणके व प्रोटोकॉलचे पालन करतात. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे मान्यताप्राप्त मोबाईल प हे सतत वातावरणीय वायू गुणवत्ता सर्वेक्षण केंद्रावरील वास्तविक वायू गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय ) प्रसारित करत असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

### व्हायरल व्हिडिओवर राहुल नार्वेकर पहिल्यांदाच बोलले; उमेदवारी मागे घेण्यासाठी ५-५ कोटी मागण्याचे प्रयत्न

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा उमेदवारी अर्ज भरताना दबाव टाकून पोलिसांना दमदाटी केल्याचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला होता. त्यावरुन, शिवसेना खासदार संजय राऊत आणि अरविंद सावंत यांनीही राहुल नार्वेकरांवर गंभीर आरोप केले होते. तर, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राहुल नार्वेकरांच्या निलंबनाची मागणी केली आहे. यासंदर्भात कुलाब्यातील इच्छुक उमेदवारांकडून न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. आता, घडल्या प्रकाराबाबत राहुल नार्वेकर यांनी पहिल्यांदाच स्पष्टीकरण दिलं आहे. तसेच, शिवसेना खासदारांनी केलेले आरोपही त्यांनी फेटाळून लावले. अरविंद सावंत यांचे आरोप हास्यास्पद आहेत, ज्या महिलेनं दबाव टाकल्याचे आरोप केले त्यांना मी पाहिलेले नाही, ना कधी भेटलो आहे, असे नार्वेकर यांनी म्हटले.

## समृध्दी महामार्गावरील वाहतूक ९ ते १३ जानेवारी दरम्यान थांबविण्यात येणार



नागपूर/वर्धा/प्रतिनिधी : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर या आठवड्यात हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत ९ ते १३ जानेवारीदरम्यान पाच दिवस वाहतूक थांबविली जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाचे जनसंपर्क अधिकारी तुषार अहिरे यांनी बुधवारी (दि.७) दिली.

**महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम केले जाणार**

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यासाठी महामार्ग ९ ते १३ जानेवारी दरम्यान काही ठिकाणी ४५ ते ६० मिनीटांसाठी पुर्णतः थांबविण्यात येणार आहे. महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या जिल्ह्यातील नागरिकांनी याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समृध्दी महामार्गावर अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे व नांदगांव खंडेश्र्वर तालुक्यातील कि.मी. ९०+५०० ते कि.मी. १५०+३०० येथे गॅन्ट्री उभारण्याचे काम १० टप्प्यात करण्यात येणार आहे. प्रत्येक टप्यादरम्यान कामाच्या टप्प्यानजीक संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांकरिता पूर्णतः थांबविण्यात येणार आहे. काम पूर्ण झाल्यावर संबंधित वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल.

त्यानुसार गॅन्ट्री उभारण्याच्या कामाकरीता ९ जानेवारी रोजी मुंबई वाहिनीवर चांदुर रेल्वे तालुक्यातील मांजरखेड व धोत्रा गावाजवळ दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहील. मांजरखेड जवळ नागपूर वाहिनीवर देखील दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहील. १० जानेवारी रोजी धामणगाव तालुक्यातील वाढोणा गावाजवळ नागपूर वाहिनीवर दुपारी ३ ते ४, चांदुर रेल्वे तालुक्यातील खंबाळा गावाजवळ मुंबई वाहिनीवर दुपारी १२ ते १ वाजतादरम्यान ब्लॉक राहील.

१२ जानेवारी रोजी नांदगाव खंडेश्र्वर तालुक्यातील शहापुर खेकडी व पाचोड गावांजवळ नागपूर वाहिनीवर दुपारी ३ ते ४ वाजतादरम्यान ब्लॉक राहील. १३ जानेवारी रोजी नांदगाव खंडेश्र्वर तालुक्यातील देऊळगाव व शहापूर खेकडी या गावांजवळ मुंबई वाहिनीवर दुपारी १२ ते १ वाजता तर देऊळगाव जवळ नागपूर वाहिनीवर देखील दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहणार आहे. या दरम्यान मार्ग वाहतुकीकरीता पुर्णतः थांबविण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

## मुंबईत ५० वर्षापासून बांगलादेशींचा तपास केला जातोय, शेख हसीना यांना भारतातून पहिल्यांदा बाहेर काढावे, त्यांच्यामुळे तिथं हिंदू अडचणीत; नवाब मलिकांचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अमित साटम लोकांची दिशाभूल करत आहेत. मागील ५० वर्षापासून बांगलादेशी आहे की नाही याचा तपास केला जात आहे. पहिल्यांदा शेख हसीना याना भारतातून बाहेर काढावं, त्यांच्यामुळे बांगलादेशमधे हिंदू अडचणीत असल्याचा टोला राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नवाब मलिक यांनी मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांना लगावला.

मुंबईत बांगलादेशींची घुसखोरी झाल्याने केंद्रीय गृह मंत्रालय कारवाई करत असल्याचे म्हटले होते. राष्ट्रवादी



काँग्रेसकडून मुंबईसाठी जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. नवाब मलिक म्हणाले की, धारावी पुनर्विकास प्रस्ताव मी २००२ साली मांडला आहे.

सगळ्यांना घरे मिळाली पाहिजे अशी आमची भूमिका आहे. धारावी विकास व्हावा अशी आमची भूमिका आधी देखील होती आणि आता देखील आहे. धारावीबाबत प्रश्न निर्माण झाल्यास अदानी विरोध करणार असतील, तर आम्ही त्यांच्या विरोधात उभ राहू असे मलिक म्हणाले. दरम्यान, राजकीय आरोपांवरून नवाब मलिक म्हणाले की, कल्याण डोंबिवलीत शिवसेना भाजपने एकमेकांवर जोरदार टीका केली. परंतु, नंतर ते एकत्र आले आणि सत्तेत देखील सहभागी झाले आहेत. आमच्यात कटुता वाढू नये यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याशी मी दोनवेळा बोललो आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी देखील बोललो, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी देखील बोललो आहे. पुढे अशी कटुता होऊ नये यावर एकमत झालं असल्याचे ते म्हणाले.

## लाडकी बहीण योजनेचा गैरवापर, ६ शासकीय कर्मचाऱ्यांकडून ९९ हजारांची वसुली

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा गैरवापर झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शासनाने या योजनेसाठी कठोर अटी घातलेल्या असतानाही, काही पूर्णवेळ शासकीय कर्मचाऱ्यांनी थेट शासनाची फसवणूक करत योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता आहे.

शासनाकडून महिला व बालकल्याण विभागाला विविध विभागांमध्ये कार्यरत १९६ कर्मचाऱ्यांची यादी प्राप्त झाली




होती. या यादीच्या आधारे करण्यात आलेल्या सखोल चौकशीत १९० कर्मचारी हे अर्धवेळ कर्मचारी असल्याचे स्पष्ट झाले. त्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असल्याने ते या योजनेसाठी पात्र ठरले.

मात्र उर्वरित ६ कर्मचारी हे पूर्णवेळ शासकीय कर्मचारी असल्याचे निष्पन्न झाले. नियमांनुसार हे कर्मचारी योजनेसाठी अपात्र असतानाही त्यांनी लाभ घेतल्याचे आढळून आले.

त्यामुळे प्रशासनाने तत्काळ कारवाई करत या सहा कर्मचाऱ्यांकडून आतापर्यंत घेतलेला संपूर्ण लाभ वसूल केला आहे. प्रत्येकी १६ हजार ५०० रुपये याप्रमाणे एकूण ९९ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. या प्रकरणी पुढील शिस्तभंगात्मक कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवण्यात आला असून, लवकरच संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

याबाबत माहिती देताना जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालकल्याण मंडळ, बुलढाणा प्रमोद येडोले यांनी सांगितले की, ''शासनाची फसवणूक करून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली असून, भविष्यात अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर अधिक कठोर कारवाई करण्यात येईल.''

या घटनेमुळे शासकीय योजनांतील पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, प्रशासनाने यापुढे अधिक काटेकोर तपासणी करण्याचा इशारा दिला आहे.

